ePaper
"मिसिंग लिंकवर दरड कोसळणं देवाचा प्रकोप", प्रशासनाचा दावा

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™






पान 3 वरुन...

अतिवृष्टीचा तडाखा; १,८८० नागरिकांचे तातडीने स्थलांतर

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 07 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मुसळधार पावसाने मुंबई-पुण्यातील जनजीवन विस्कळीत

# राज्यात पावसाचं थैमान!

**महाईन्यूज । पुणे**

**राज्यात सर्वदूर मोठा पाऊस कोसळत आहे. ठिकठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. मुंबईत रात्री घडलेल्या एका दुर्दैवी घटनेत चाळीचा भाग कोसळून ६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसामुळं प्रशासनाने शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. दुसरीकडे, घाटमाथ्यावर दरड कोसळल्याने मुंबई-पुणे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. पुणे शहर आणि परिसरात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने मुंबई, ठाणे, पालघर आणि पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांना आज सुट्टी जाहीर केली असून, नागरिकांना अत्यंत आवश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**




पावसामुळं कर्जत आणि लोणावळा दरम्यानच्या दक्षिण-पूर्व घाट परिसरात, ठाकूरवाडी ते मंकी हिल दरम्यान रेल्वेच्या मुख्य मार्गावर दरड कोसळली आहे. यामुळे मध्य रेल्वेने या मार्गावरील अनेक लोकल आणि एक्स्प्रेस गाड्या रद्द केल्या आहेत, तर काहींचे मार्ग बदलले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकवरील बोगदा क्रमांक २ च्या बाहेर देखील पहाटेच्या सुमारास दरड कोसळली. सुरक्षेची खबरदारी म्हणून आज पहाटे ४ वाजेपासूनच या मार्गावरील वाहतूक इतर मार्गांवर वळवण्यात आली आहे.

एकीकडे नैसर्गिक आपत्तीने राज्याला घेरले असताना, दुसरीकडे मुंबईत सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात याचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे. राज्यातील विविध भागांत झालेल्या दुर्घटना, मुंबई-पुण्यातील वाहतूक कोंडी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यांवरून विरोधक आज सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे आज विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळू शकते.

## नाशिकमध्ये ढगफुटी होण्याची शक्यता



नाशिक त्र्यंबकेश्वर परिसरात अतिमुसळधार पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक या तीन तालुक्यात जास्त पावसाची शक्यता आहे. पेठ, दिंडोरी, कळवण, सटाणा, बागलाण या तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार आहे. पण कमी वेळात अतिमुसळधार पाऊस, ज्याला आपण ढगफुटी म्हणतो तसा पाऊस त्र्यंबकेश्वर, नाशिक आणि इगतपुरी परिसरात पडण्याची शक्यता आहे. नाशिक शहराच्या पश्चिम भागात जास्त पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून हवामान इशारा मिळेल तसा आपल्याला नेमका कुठे जास्त पाऊस पडणार याची माहिती अधिक स्पष्टपणे मिळेल, असं जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले.

# महापुराच्या विळख्यात आळंदी; पालखी सोहळा मात्र नियोजित

## प्रशासन सतर्क; वारकऱ्यांना दिंडी प्रमुखांच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

**महाईन्यूज । आळंदी**



**सततच्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला आलेल्या महापुराने तीर्थक्षेत्र आळंदीतील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. नदीची पाणीपातळी धोक्याच्या पातळीवर पोहोचल्याने प्रशासनाने आळंदीला जोडणारे चारही प्रमुख पूल वाहतुकीसाठी बंद केले आहेत. त्यामुळे शहरात येण्या-जाण्यावर निर्बंध आले असून, भाविकांनी सध्या आळंदीकडे येण्याऐवजी ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित राहावे, असे आवाहन जिल्हा व राज्य प्रशासनाने केले आहे.**

दरम्यान, बुधवारी (८ जुलै) संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान नियोजित असून, सध्याच्या पूरस्थितीचा पालखी सोहळ्यावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्टने स्पष्ट केले आहे. प्रस्थान सोहळा नियोजित वेळेत आणि पूर्वनियोजित रूपरेषेनुसारच पार पडेल, अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिली.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देवस्थान ट्रस्ट सर्व दिंडीप्रमुखांच्या सतत संपर्कात असून आवश्यक त्या सूचना देण्यात येत आहेत. प्रत्येक वारकरी भक्ताने आपल्या दिंडी प्रमुखांच्या संपर्कात राहून प्रशासन व देवस्थानच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

पूरपरिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. सुरक्षित आणि सुरळीत आषाढी पालखी सोहळा पार पाडण्यासाठी प्रशासन आणि देवस्थान ट्रस्टकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

### वारकऱ्यांना महत्त्वाचे आवाहन

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी सध्या आळंदीत येऊ नये, ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित राहावे आणि आपल्या दिंडी प्रमुखांच्या संपर्कात राहून प्रशासन व देवस्थानकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करावे. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासन आणि देवस्थान ट्रस्टकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

### पालखी प्रस्थान नियोजित वेळेतच

पूरपरिस्थिती असूनही संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान ८ जुलै रोजी नियोजित वेळेतच होणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिली. देवस्थान ट्रस्ट सर्व दिंडी प्रमुखांच्या संपर्कात असून वारकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सलग तीन दिवसांच्या मुसळधार पावसाने भीमाशंकर विस्कळीत



**महाईन्यूज । भीमाशंकर**

**आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी पट्ट्यातील भीमाशंकर, पाटण आणि आहुपे खोऱ्यात सलग तीन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. डोंगरदऱ्या आणि दुर्गम वाड्या-वस्त्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी नागरिकांना दैनंदिन जीवन जगताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी रस्ते खचले असून काही मार्गांवर पाणी आल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. डोंगर उतारांवर लहान-मोठ्या दरडी कोसळल्याने अनेक रस्ते धोकादायक बनले आहेत. त्यामुळे गावागावांतील संपर्क विस्कळीत झाला असून अत्यावश्यक कामांशिवाय नागरिकांनी बाहेर पडणे टाळले आहे.

मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका शेतीला बसला आहे. अनेक भातखाचरांचे बांध फुटल्याने पाणी शेतात शिरले असून नव्याने उगविलेल्या भातपिकाच्या नुकसानाची भीती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे सुपीक माती वाहून गेल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

दरम्यान, जनावरांच्या देखभालीवरही पावसाचा परिणाम झाला आहे. गुरांसाठी चारा आणणे आणि दैनंदिन कामे करणे कठीण झाले असून ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने अंतर्गत संपर्कही खंडित झाला आहे.

हवामान विभागाने पुढील काही दिवसही जोरदार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने सतर्कता वाढविली आहे. नागरिकांनी दरडप्रवण भाग, ओढे-नाले आणि पूरग्रस्त ठिकाणी जाणे टाळावे तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

माजी गृहमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांनीही नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करत, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.

### दरडींचा धोका; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

सततच्या पावसामुळे भीमाशंकर, पाटण आणि आहुपे खोऱ्यातील दरडप्रवण भाग धोकादायक बनले आहेत. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, ओढे-नाले, पूरग्रस्त ठिकाणे आणि दरडप्रवण रस्त्यांवर जाणे टाळावे, तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनासह दिलीपराव वळसे पाटील यांनी केले आहे.

### शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती

सलग तीन दिवसांच्या मुसळधार पावसामुळे भीमाशंकर परिसरातील अनेक भातखाचरांचे बांध फुटले असून पाणी थेट शेतात शिरले आहे. नव्याने उगविलेल्या भातपिकाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असून काही ठिकाणी पाण्याच्या वेगामुळे सुपीक मातीही वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून नुकसानभरपाईची मागणी जोर धरू लागली आहे.

# अतिवृष्टीचा तडाखा; १,८८० नागरिकांचे तातडीने स्थलांतर

## भाटनगर, किवळे, बोपखेल, पिंपळे गुरवसह संवेदनशील भागांवर विशेष लक्ष

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेने तत्पर कारवाई करत नदीकाठच्या पूरबाधित भागांतील १,८८० नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले आहे. पूरग्रस्तांसाठी विविध ठिकाणी निवारा केंद्रे उभारण्यात आली असून तेथे भोजन, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच महापालिकेचा आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.**




### निवारा केंद्रांतील नागरिकांची संख्या
**(६ जुलै २०२६, दुपारी २ वाजेपर्यंत)**

| | |
|---|---|
| 'अ' क्षेत्रीय कार्यालय | ३०० नागरिक |
| 'ब' क्षेत्रीय कार्यालय | ६३० नागरिक |
| 'ड' क्षेत्रीय कार्यालय | ९५० नागरिक |
| 'ह' क्षेत्रीय कार्यालय | २१० नागरिक |

महापालिकेने नदीकाठच्या नागरिकांना तातडीने सुरक्षितस्थळी हलविण्याची मोहीम राबवली. संभाव्य धोक्याचा अंदाज घेऊन संबंधित भागातील नागरिकांना ध्वनीक्षेपकाद्वारे पूर्वसूचना देण्यात आली. पावसाचा जोर वाढल्यास कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

पूर निवारा केंद्रांमध्ये वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली असून पूरबाधितांची आरोग्य तपासणी व प्राथमिक उपचार केले जात आहेत. भोजन, पिण्याचे पाणी तसेच इतर मूलभूत सुविधांमध्ये कोणतीही कमतरता भासू नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी महापालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्षाचे ०२०-६७३३११११ / ०२०-२८३३११११ किंवा अग्निशमन विभागाच्या ७०३०९०८९९१ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

# इंद्रायणीला महापूर; देहू-आळंदीत न येण्याचे वारकऱ्यांना आवाहन





**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर देहू आणि आळंदी परिसरात मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला महापूर आला असून परिस्थिती गंभीर बनली आहे. नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने आळंदीकडे जाणारे सर्व प्रमुख मार्ग बंद करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक प्रशासनाने वारकऱ्यांना देहू-आळंदीत येऊ नये, ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित थांबावे आणि पुणे किंवा पिंपरी-चिंचवड हद्दीतून पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.**

गेल्या दोन दिवसांपासून पुणे जिल्ह्यासह मावळ, देहू आणि आळंदी परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीच्या वाढत्या पाणीपातळीमुळे आळंदी आणि देहू परिसरातील अनेक पूल पाण्याखाली गेले असून प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक बंद केली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दिंडी प्रमुखांच्या माध्यमातून वारकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, पालखी सोहळ्यासाठी आधीच देहू आणि आळंदीत दाखल झालेल्या अनेक वारकऱ्यांना पावसाचा फटका बसला आहे. आळंदीतील भक्तनिवास परिसरात पुराचे पाणी शिरल्याने सिद्धबेट, ज्ञानेश्वरी मंदिर परिसर, इंद्रायणीनगरी, ठाकूरबुवा मंडप आणि गोपाळपुरा येथील भाविकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी (७ जुलै) नियोजित असून पहाटेपासून धार्मिक विधी सुरू होतील. दुपारी इनामदार वाड्यातून पालखी प्रस्थान करेल आणि रात्री त्याच ठिकाणी मुक्काम असेल. बुधवारी (८ जुलै) संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून तुकोबांची पालखी आकुर्डी येथे मुक्कामी पोहोचणार आहे. सध्याची पूरस्थिती लक्षात घेऊन प्रस्थान सोहळा प्रतिकात्मक स्वरूपात पार पडणार असल्याचे संस्थानकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### आळंदीतील चारही पूल बंद

इंद्रायणी नदीवरील पूलांवर सुमारे आठ फूट पाणी आल्याने आळंदीतील चारही पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. नदीकाठावर अडकलेल्या सुमारे ६०० वारकऱ्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले असून प्रशासनाने नागरिक व वारकऱ्यांना नदीपात्राजवळ जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

### तुकोबांचे पालखी प्रस्थान आज दुपारी

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी (७ जुलै) होणार आहे. पहाटेपासून शिळा मंदिर, तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिर आणि इनामदार वाड्यात धार्मिक विधी व महापूजा पार पडतील. सकाळी देहूकर महाराजांचे काल्याचे कीर्तन झाल्यानंतर दुपारी सुमारे अडीच वाजता इनामदार वाड्यातून महाराजांच्या पादुकांचे प्रस्थान होईल. त्यानंतर पालखी प्रदक्षिणा काढून सायंकाळी पालखी पुन्हा इनामदार वाड्यात मुक्कामी राहणार आहे. पूरस्थितीमुळे यंदाचा प्रस्थान सोहळा प्रतिकात्मक स्वरूपात पार पडणार असून वारकऱ्यांनी देहूत गर्दी न करता पुढील मार्गावरून पालखीत सहभागी व्हावे, असे संस्थानने आवाहन केले आहे.

> "इंद्रायणी नदीच्या वाढत्या पाणीपातळीमुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे वारकऱ्यांनी देहूत गर्दी न करता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. पालखी प्रस्थान सोहळा नियोजनानुसार प्रतिकात्मक स्वरूपात पार पडेल."
>
> **- ह.भ.प. जालिंदर महाराज मोरे,**
> **अध्यक्ष, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू**



## भूमिका

**मुंबईत शाळेच्या बसवर झाड कोसळून एका ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू आणि अनेक विद्यार्थी जखमी झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. अशा घटनेनंतर शासनाकडून संवेदनशीलता, जबाबदारी आणि ठोस कृतीची अपेक्षा असते. मात्र, एका मंत्र्याने "झाड पडणे ही नैसर्गिक घटना आहे" अशी प्रतिक्रिया देत या दुर्घटनेची गंभीरता कमी करण्याचा प्रयत्न केला.**

# 'नैसर्गिक' दुर्घटना की मानवनिर्मित निष्काळजीपणा?




ही केवळ असंवेदनशील प्रतिक्रिया नसून लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित असलेल्या उत्तरदायित्वालाच हरताळ फासणारी आहे. नैसर्गिक आपत्ती आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे घडणाऱ्या दुर्घटना यांत मूलभूत फरक आहे. शहरातील धोकादायक झाडांची वेळेवर छाटणी, देखभाल आणि सुरक्षा उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरले, तर त्याची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी ती निसर्गावर ढकलणे योग्य ठरू शकत नाही.

लोकप्रतिनिधींचे कर्तव्य केवळ स्पष्टीकरण देणे नसून नागरिकांचे प्राण सुरक्षित ठेवण्यासाठी प्रभावी व्यवस्था उभारणे हे आहे. ही घटना अपवादात्मक नाही. उघडी गटारे, खड्डेमय रस्ते, पावसात तुंबणारे रस्ते, निकृष्ट दर्जाची सार्वजनिक कामे आणि नियोजनशून्य शहरी विकास यामुळे दरवर्षी अनेक नागरिकांचा जीव जातो. तरीही या प्रश्नांवर गंभीर चर्चा होत नाही.

त्याऐवजी पक्षांतर, सत्तासमीकरणे आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांनाच अधिक महत्त्व दिले जाते. परिणामी नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होते. शहरांमध्ये विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर काँक्रीटीकरण, वृक्षतोड आणि नियोजनशून्य बांधकामे होत आहेत.

कंत्राटी विकासातून काहींचा फायदा होत असला, तरी त्याची किंमत सामान्य नागरिकांना जीव धोक्यात घालून चुकवावी लागत आहे. सुरक्षित रस्ते, पदपथ, जलनिस्सारण व्यवस्था आणि पर्यावरणपूरक नियोजन यांपेक्षा कंत्राटांना प्राधान्य दिले जात असल्याची भावना अधिक बळकट होत आहे. या परिस्थितीसाठी केवळ प्रशासन किंवा लोकप्रतिनिधींनाच दोष देऊन चालणार नाही. समाजाची वाढती उदासीनताही तितकीच कारणीभूत आहे.

अन्याय, निष्काळजीपणा किंवा भ्रष्टाचार याविरोधात ठाम आवाज उठविण्याऐवजी आपण "आपले" आणि "त्यांचे" या राजकीय चष्म्यातून प्रत्येक प्रश्नाकडे पाहू लागलो आहोत. त्यामुळे सार्वजनिक हिताचे प्रश्न मागे पडतात आणि निष्क्रियतेला खतपाणी मिळते. लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते.

ती सतत प्रश्न विचारणाऱ्या, जबाबदारीची मागणी करणाऱ्या आणि सार्वजनिक हितासाठी सजग राहणाऱ्या नागरिकांवर उभी असते. नागरिक जागरूक राहिले, तरच प्रशासन उत्तरदायी राहते. अन्यथा अशा दुर्घटना, असंवेदनशील विधाने आणि निष्काळजी कारभार यांचे चक्र कायम सुरू राहते.

समाजाने व्यक्तिपूजा, पक्षनिष्ठा आणि राजकीय अंधश्रद्धा यापलीकडे जाऊन सार्वजनिक जबाबदारीला प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा विकासाच्या गप्पा रंगत राहतील; पण सुरक्षित, सुसंस्कृत आणि उत्तरदायी समाज घडण्याचे स्वप्न अपूर्णच राहील. हीच आजच्या लोकशाहीसमोरील सर्वात मोठी शोकांतिका आणि खऱ्या अर्थाने "आपली" लायकी ठरेल.

## प्रासंगिक »

### लोभापायी नुकसान

**बलवंतपूर गावातील चतुरसेन नावाचा पहिलवान ताकदवान आणि अत्यंत चतुर म्हणून प्रसिद्ध होता. एकदा दुसऱ्या राज्यातील रामशरण नावाचा बलवान पहिलवान त्या गावात आला.**

गावकऱ्यांनी दोघांची कुस्ती आयोजित केली आणि विजेत्यास हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. कुस्ती सुरू होताच रामशरण वरचढ ठरला. आपण पराभूत होणार हे लक्षात येताच चतुरसेनने त्याच्या कानात कुजबुजत म्हटले, "तू हरलास तर मी तुला गुपचूप दोन हजार रुपये देईन. माझी प्रतिष्ठा वाचेल आणि तुलाही दुप्पट पैसे मिळतील." दुप्पट पैशांच्या लोभाने रामशरणने मुद्दाम कुस्ती हरली.

बक्षीस समारंभानंतर तो चतुरसेनकडे पैसे मागण्यासाठी गेला. तेव्हा चतुरसेन हसत म्हणाला, "कुस्तीत फक्त शारीरिकच नव्हे तर मानसिक डावपेचही असतात. तू माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून लोभ केला आणि स्वतःच हरलास. आता तुला कोणतेही पैसे मिळणार नाहीत." रामशरणला आपली चूक उमगली. लोभामुळे त्याने विजय, मान-सन्मान आणि बक्षीस या सर्व गोष्टी गमावल्या.

- तात्पर्य : **लोभापायी सर्वस्वाची हानी होऊ शकते तेव्हा लोभापासून दूर असलेले बरे.**

अमेरिकेच्या स्वातंत्र्याला २५० वर्षे पूर्ण होत असताना तेथील भारतीय समाजाचा इतिहास हा केवळ यशाचा नाही, तर संघर्ष, भेदभाव आणि जिद्दीचा प्रवास आहे.

# अमेरिकेतील भारतीयांचा २५० वर्षांचा संघर्षमय प्रवास

आज भारतीय वंशाच्या व्यक्ती अमेरिकेच्या राजकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर पोहोचल्या आहेत. मात्र, या यशामागे अनेक पिढ्यांनी सहन केलेला अन्याय आणि कठोर संघर्ष दडलेला आहे. अमेरिकेत भारतीयांचे अस्तित्व स्वातंत्र्यपूर्व काळापासून आढळते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पंजाबमधील अनेक शीख शेतकरी रोजगाराच्या शोधात कॅलिफोर्नियात दाखल झाले. त्यांनी केवळ श्रमच केले नाहीत, तर अमेरिकेतील पहिला गुरुद्वाराही उभारला.

याच भूमीतून १९१३ मध्ये गदर पक्षाची स्थापना झाली आणि भारताच्या स्वातंत्र्याचा आवाज अमेरिकेतून जगभर पोहोचला. भारतीयांवरील वांशिक भेदभावाचे सर्वाधिक ठळक उदाहरण म्हणजे भगतसिंग थिंड यांचे प्रकरण. अमेरिकेसाठी युद्धात लढूनही त्यांना "गोरे नाही" या कारणावरून नागरिकत्व नाकारण्यात आले. या निर्णयामुळे अनेक भारतीयांचे नागरिकत्व आणि



मालमत्तेचे हक्क धोक्यात आले. वैश्नो दास बागाई यांची शोकांतिका ही त्याच अन्यायाची वेदनादायी आठवण आहे. तरीही भारतीय समाजाने हार न मानता आपल्या हक्कांसाठी संघर्ष सुरू ठेवला.दुसऱ्या महायुद्धानंतर परिस्थिती बदलू लागली.

१९४६ मध्ये नागरिकत्वाचे दरवाजे काही प्रमाणात खुले झाले, तर १९६५ नंतर कौशल्याधारित स्थलांतर धोरणामुळे भारतीय डॉक्टर, अभियंते, संशोधक आणि तंत्रज्ञ मोठ्या संख्येने अमेरिकेत पोहोचले. त्यांच्या गुणवत्तेच्या जोरावर त्यांनी जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. आज अनेक आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांचे नेतृत्व भारतीय वंशाच्या व्यक्तींकडे आहे, तर अमेरिकेच्या सर्वोच्च राजकीय पदांपर्यंतही भारतीय वंशाचे प्रतिनिधित्व पोहोचले आहे. तथापि, हा प्रवास अजूनही पूर्ण झालेला नाही. व्हिसा, स्थलांतर आणि नागरिकत्वासंबंधी बदलणारी धोरणे भारतीयांसाठी आजही अनिश्चिततेचे कारण ठरतात. विशेषतः अलीकडील काळात स्थलांतर नियम अधिक कठोर झाल्याने अनेक विद्यार्थी, व्यावसायिक आणि कुटुंबांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

भारतीयांचा अमेरिकेतील इतिहास हा स्वप्नपूर्तीइतकाच संघर्षाचाही इतिहास आहे. भेदभावाच्या अंधारातून प्रगतीच्या शिखरापर्यंत पोहोचलेल्या या समाजाने जिद्द, परिश्रम आणि गुणवत्तेच्या बळावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. मात्र, समान संधी आणि स्वीकारासाठीचा हा प्रवास आजही सुरू असून, तोच भारत-अमेरिका संबंधांतील सर्वात महत्त्वाचा मानवी पैलू ठरतो.

## ।। अभंगवाणी ।।



नये जरी तुज मधुर उत्तर ।
दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥

नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल ।
येइल तैसा बोल रामकृष्ण ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पावसाचा रौद्रावतार; पुणे जिल्ह्यात चार बळी

## पूर, दरडी आणि बचावकार्यात एनडीआरएफ-पीएमआरडीएची धाव

**महाईन्यूज । पुणे**

**गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने पुणे जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले असून विविध दुर्घटनांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला आहे. मावळ तालुक्यातील पाटण येथे दरड कोसळून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला, तर खेड तालुक्यातील शेलू कुरकुंडी येथे एक जण पुराच्या पाण्यात वाहून गेला. दरम्यान, जिल्ह्यातील पूरग्रस्त भागांत अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी एनडीआरएफ, पीएमआरडीए, अग्निशमन दल आणि स्थानिक आपत्ती मित्रांनी युद्धपातळीवर बचावकार्य राबविले.**

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत लोणावळ्यात सर्वाधिक ६७० मिमी पावसाची नोंद झाली. पुणे शहरासह जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील २७ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असून मावळ, मुळशी, हवेली, खेड, भोर आणि वेल्हे तालुक्यांना पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. सततच्या पावसामुळे नद्या, ओढे आणि धरणांतील पाणीपातळी झपाट्याने वाढली असून अनेक सखल भाग जलमय झाले आहेत.

मावळ तालुक्यातील पाटण येथे घरावर दरड कोसळून नंदू तिकोने, अनिता तिकोने आणि ज्ञानेश्वर तिकोने यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर एनडीआरएफ, पीएमआरडीए, शिवदुर्ग रेस्क्यू टीम आणि स्थानिक स्वयंसेवकांनी ढिगारा हटवून बचावकार्य केले. खेड तालुक्यातील शेलू कुरकुंडी येथे नाल्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या व्यक्तीचा शोध सुरू आहे.







### वाहतुकीवर मोठा परिणाम

मुसळधार पावसामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक परिसरात दरड कोसळल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. बोरघाटातील दरडीमुळे रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला. मुळशीतील शिरगाव-मोहरी मार्ग, भोर तालुक्यातील महाड-पंढरपूर मार्ग तसेच खंडाळा आणि पांगोळी परिसरातील काही रस्तेही दरडीमुळे बंद करण्यात आले.

### जिल्हा प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू असल्याने संपूर्ण आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा हाय अलर्टवर ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, घाट रस्ते आणि दरडप्रवण भागातील प्रवास टाळावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी ज्योती कदम यांनी केले आहे.

### अनेक ठिकाणी मोठे बचावकार्य

आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या पुरामुळे अडकलेल्या ४०८ भाविकांची तसेच एका मठात अडकलेल्या २० पोलिस जवानांची सुरक्षित सुटका करण्यात आली. पुणे शहरातील औंध परिसरातील आदर्श नगर येथील ३० कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले. तळेगाव दाभाडेजवळील कुंडमळा रस्त्यावर पाण्यात अडकलेल्या स्कोडा-फॉक्सवॅगन कंपनीच्या बसमधील ३० कर्मचाऱ्यांना अग्निशमन दलाने सुखरूप बाहेर काढले. चाकणमधील सुंबरेनगर येथेही पाण्यात अडकलेल्या बसमधील प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्यात आली.

# कनेक्टिंग लिंक'वर दरड; "जूनमध्येच इशारा दिला होता"

**महाईन्यूज । मुंबई**

**पुणे–मुंबई द्रुतगती मार्गावरील 'कनेक्टिंग लिंक' प्रकल्पाच्या बोगद्याजवळ दरड कोसळल्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. या मार्गाच्या गुणवत्तेबाबत जून महिन्यातच सार्वजनिकपणे इशारा दिला होता, असा दावा करत त्यांनी प्रकल्पाच्या दर्जा, सुरक्षा तपासणी आणि वाढलेल्या खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.**

सोमवारी पहाटे झालेल्या मुसळधार पावसामुळे 'कनेक्टिंग लिंक'च्या पहिल्या बोगद्याजवळ डोंगराचा काही भाग कोसळला. त्यामुळे रिटेनिंग वॉलचे नुकसान होऊन पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद ठेवावी लागली. त्यानंतर प्रशासनाने युद्धपातळीवर दरड हटवून मार्ग पूर्ववत करण्याचे काम सुरू केले.

या घटनेनंतर आदित्य ठाकरे यांनी **"एक्स"**वर पोस्ट करत 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले. १ मे २०२६ रोजी उद्घाटन झालेल्या या प्रकल्पाची किंमत हजारो कोटी रुपयांनी वाढविण्यात आली. मात्र अवघ्या दोन महिन्यांतच येथे दरड कोसळली. मग सुरक्षा तपासणी न करताच उद्घाटन करण्यात आले होते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ठाकरे यांनी पुढे म्हटले की, जून महिन्यात पुण्याहून परत येताना या मार्गाचा वापर केला असता रस्ता उंच-सखल असल्याचे लक्षात आले होते. त्यावेळीच हा मुद्दा सार्वजनिकपणे मांडला होता. संपूर्ण रस्त्यावर प्रवास करताना बोटीत बसून लाटांवरून जात असल्यासारखा अनुभव येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सततच्या पावसामुळे डोंगर उतारावरील माती व दगड घसरल्याने ही दरड कोसळल्याचे प्राथमिक कारण समोर आले असून, प्रशासनाकडून घटनास्थळी दुरुस्ती व सुरक्षेची कामे सुरू आहेत.

### 'सेफ्टी चेकशिवाय उद्घाटन केले का?' – आदित्य ठाकरेंचा सवाल

पुणे–मुंबई द्रुतगती मार्गावरील 'कनेक्टिंग लिंक' प्रकल्पाचे उद्घाटन १ मे २०२६ रोजी झाले. मात्र अवघ्या दोन महिन्यांतच बोगद्याजवळ दरड कोसळल्याने प्रकल्पाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर उद्धवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनी, "जून महिन्यातच या मार्गाच्या दर्जाबाबत सार्वजनिकपणे इशारा दिला होता. रस्ता उंच-सखल असून सुरक्षा तपासणी न करताच उद्घाटन करण्यात आले का?" असा सवाल उपस्थित केला. तसेच प्रकल्पाचा खर्च हजारो कोटींनी वाढला असताना त्याचा दर्जा आणि सुरक्षिततेची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.



# ‘ॲक्ट ईस्ट’ला मिळणार नवी गती!

## पंतप्रधान मोदींचा इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडचा महत्त्वाचा दौरा सुरू

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी ६ ते ११ जुलै २०२६ या कालावधीत इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या सहा दिवसांच्या महत्त्वपूर्ण दौऱ्यावर रवाना झाले आहेत. भारताचे ‘ॲक्ट ईस्ट’ धोरण, ‘महासागर’ दृष्टीकोन आणि मुक्त इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील प्राधान्य पुढे नेण्याचा या दौऱ्याचा उद्देश आहे.**



> आमच्या द्विपक्षीय संबंधांमध्ये भारतीय समुदायाचे मोठे योगदान राहिले आहे आणि या दौऱ्या दरम्यान, सर्व क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या भारतीय समुदायाच्या एका मोठ्या मेळाव्याला संबोधित करण्यास मी उत्सुक आहे.
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान.

पंतप्रधान मोदी म्हणाले, “माझा पूर्व आणि दक्षिण हिंद महासागरातील अनुक्रमे इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलियाचा दौरा आणि त्यानंतरचा न्यूझीलंडचा दौरा भारताच्या ‘ॲक्ट ईस्ट’ धोरणाला, ‘महासागर’ दृष्टीकोनाला, तसेच एका मुक्त आणि खुल्या इंडो-पॅसिफिक क्षेत्राविषयीच्या आमच्या दृष्टिकोनाला बळ देईल.”

दौऱ्याचा पहिला टप्पा इंडोनेशिया असून, ६ ते ८ जुलै दरम्यान पंतप्रधान मोदी राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांची भेट घेतील. २०१८ नंतरची ही त्यांची पहिली द्विपक्षीय भेट आहे. या भेटीदरम्यान दोन्ही पंतप्रधान सुरक्षा, व्यापार आणि सांस्कृतिक सहकार्यावर चर्चा करतील. तसेच, प्रंबनन मंदिराला ते भेट देणार असून, इंडोनेशियातील भारतीय समुदायाशीही संवाद साधतील. युनेस्कोच्या जागतिक वारसा जागांमध्ये समाविष्ट असलेल्या या मंदिराचा उल्लेख पंतप्रधानांनी दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंधांचे प्रतीक म्हणून केला.

### ऑस्ट्रेलिया दौरा

दौऱ्याचा दुसरा टप्पा ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे असेल. पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्यात द्विपक्षीय चर्चा होईल. या चर्चेत संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, शिक्षण, मोबिलिटी आणि दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यावर भर दिला जाईल. पंतप्रधान मोदी यांनी तिथल्या भारतीय समुदायाला दोन देशांमधील संबंधांचा एक ‘महत्त्वाचा आधार’ म्हटले आहे.

### न्यूझीलंड दौरा

दौऱ्याचा शेवटचा टप्पा ऑकलंड (न्यूझीलंड) येथे असेल. पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांच्यासोबतच्या चर्चेत भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करारानंतर दोन्ही देशांमधील आर्थिक, व्यापारी आणि व्यावसायिक सहभागाचे संबंध आणखी कसे वाढवता येतील, यावर दोन्ही पंतप्रधान चर्चा करतील. मार्च २०२५ मध्ये झालेल्या लक्सन यांच्या भारत भेटीनंतर निर्माण झालेली गती या भेटीतून अधिक वाढवण्याचा प्रयत्न असेल.

# पत्नीला प्रेयसीच्या खोलीवर नेलं आणि गोळ्या झाडून केली हत्या

**महाईन्यूज । गुरूग्राम**


**केतन अग्रवालची हत्या त्याची होणारी पत्नी सियानेच केल्याचा आरोप आहे. ही घटना ताजी असतानाच अशाच बातम्या समोर येत आहेत. गुरुग्राम या ठिकाणी एका माणसाने त्याच्या पत्नीला प्रेयसीच्या घरी नेलं आणि तिथे गोळ्या झाडत तिची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. पत्नीची हत्या केल्यानंतर हा इसम प्रेयसीला घेऊन फरार झाला होता. पोलिसांनी त्याला अटक केल्यानंतर ही धक्कादायक घटना समोर आली आहे.**



अंकित नावाच्या २५ वर्षीय तरुणाचं लग्न काही महिन्यांपूर्वी झालं होतं. मात्र त्याचं प्रेम त्याच्या प्रेयसीवर म्हणजेच रजनी देवीवर होतं. रजनी देवी ३८ वर्षांची आहे. अंकित हा गुरुग्राम मधील मानेसरचा रहिवासी आहे. तर त्याची प्रेयसी रजनी ही हरियाणातील जझ्झरची रहिवासी आहे. या दोघांचे तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. तर मागील तीन महिन्यांपूर्वी अंकितचं लग्न झालं होतं. रजनी ज्या खोलीत भाडे तत्त्वावर राहात होती तिथे अंकित त्याच्या पत्नीला घेऊन आला. तिथे अंकितने तिच्यावर गोळ्या झाडल्या आणि तिला ठार मारलं. त्यानंतर अंकित आणि रजनी या ठिकाणाहून फरार झाले अशी माहिती पोलिसांनी दिली. अंकितने त्याच्या पत्नीला घेऊन रजनीच्या खोलीवर जायचं तिथे अंकितने पत्नीला ठार झाल्यावर दोघांनी पळ काढायचा हा कट या दोघांनी आधीच आखला होता असंही पोलिसांनी सांगितलं.

अंकितच्या लग्नानंतर तीन महिन्यांतच ही घटना घडली आहे. ही घटना मे महिन्यातील आहे. २१ मे पासून अंकितची पत्नी घरात नव्हती. त्यामुळे सुरुवातीला ती बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या आई वडिलांनी नोंदवली. तसंच सासरच्या लोकांकडे जेव्हा तिच्याविषयी चौकशी केली तेव्हा त्यांना समाधानकारक उत्तरं मिळाली नाहीत. त्यामुळे मग ही तक्रार दाखल करण्यात आली. तसंच अंकित किंवा त्याच्या घरातले काय घडलंय हे नीट सांगत का नाहीत? असाही प्रश्न त्यांना पडला होता आणि संशयही आला होता.

ज्यानंतर मृत महिलेच्या आईने पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सुरुवातीला या महिलेला बेपत्ता समजून तिचा शोध सुरु केला होता. मात्र काही दिवसांनी पोलिसांना हा कट लक्षात आला. कारण पोलिसांनी फरार झालेल्या तिच्या नवऱ्याला अटक केली.



### अंकित प्रेयसीसह नेपाळला पळाला

पोलिसांनी अंकित आणि त्याची प्रेयसी रजनी या दोघांनाही अटक केली आहे. अंकितचं मानेसर या ठिकाणी तंबाखूचं दुकान आहे. तर रजनी ही एका ब्युटी पार्लरमध्ये काम करते. तीन वर्षांपासून या दोघांचं सूत जुळलं होतं. याच कारणामुळे तीन महिन्यांपूर्वी अंकितचं ज्या स्त्रीशी लग्न झालं तिला त्याने संपवलं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अंकितच्या पत्नीला ठार केल्यानंतर अंकित आणि रजनी हे दोघंही आधी हरिद्वारला गेले. तिथून नेपाळला पळाले होते. ३० जून पर्यंत हे दोघंही फरार होते. पण जेव्हा ते भारतात आले तेव्हा मानेसरचे पोलीस त्यांच्या मागावर होतेच. पोलीस या प्रकरणी आता पुढील कारवाई पूर्ण करत आहेत.



# 'टॉक्सिक' वाद पेटला

दाक्षिणात्य सुपरस्टार यश याचा आगामी टॉक्सिक चित्रपट सध्या चांगलाच चर्चेत आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. मात्र टीझरमध्ये दाखवण्यात आलेल्या काही बोल्ड आणि इंटिमेट दृश्यांमुळे सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला आहे. अनेक प्रेक्षकांनी या दृश्यांवर आक्षेप घेत चित्रपटात गरजेपेक्षा जास्त बोल्डनेस दाखवल्याचा आरोप केला आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर अभिनेत्री हुमा कुरेशी हिने प्रथमच आपली भूमिका स्पष्ट केली आहे. टीझर प्रदर्शित झाल्यानंतर सोशल मीडियावर जोरदार टीका सुरू झाली. काही प्रेक्षकांनी चित्रपटाच्या कथेशी या दृश्यांचा संबंध काय आहे, असा प्रश्न उपस्थित केला. तर काहींनी केवळ प्रेक्षकांचे लक्ष वेधण्यासाठी अशा प्रकारचे बोल्ड सीन्स दाखवण्यात आल्याची टीका केली. या चर्चेमुळे 'टॉक्सिक' रिलीज होण्यापूर्वीच चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. या टीकेला उत्तर देताना हुमा कुरेशीने सांगितले की, प्रेक्षकांनी केवळ टीझर पाहून संपूर्ण चित्रपटाबद्दल मत बनवू नये. तिच्या मते, टीझर हा चित्रपटाचा फक्त एक छोटासा भाग असतो. संपूर्ण कथा समजून घेतल्याशिवाय कोणताही निष्कर्ष काढणे योग्य नाही. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांना या दृश्यांचा कथेशी असलेला संबंध समजेल, असेही तिने सांगितले. त्यामुळे चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत संयम ठेवण्याचे आवाहन तिने प्रेक्षकांना केले.




# 'खाशाबा' चित्रपट नव्या वादात

प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या बहुप्रतीक्षित 'खाशाबा' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित होताच नव्या वादाला तोंड फुटले आहे. लेखक संजय दुधाणे यांनी चित्रपटाच्या टीझरमधील काही दृश्ये त्यांच्या 'ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव' या पुस्तकातील कथनाशी मिळती-जुळती असल्याचा दावा करत कॉपीराइट उल्लंघनाचा आरोप केला आहे. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असून पुणे दिवाणी न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी 10 जुलै रोजी निश्चित केली आहे. लेखक संजय दुधाणे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी लिहिलेल्या 'ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव' या पुस्तकातील काही महत्त्वाच्या प्रसंगांचा चित्रपटात आणि विशेषतः टीझरमध्ये परवानगी न घेता वापर करण्यात आला आहे. त्यांच्या मते, या दृश्यांचे सादरीकरण हे केवळ ऐतिहासिक घटनांचे सामान्य चित्रण नसून त्यांच्या पुस्तकातील नाट्यमय मांडणीशी साधर्म्य दर्शवते. या पार्श्वभूमीवर दुधाणे यांनी 10 ऑक्टोबर 2024 रोजी नागराज मंजुळे, निर्मात्या ज्योती देशपांडे, Jio Studios आणि Aatpat Productions यांच्याविरोधात कॉपीराइट उल्लंघनाचा दावा दाखल केला होता.

# अभिनयापलीकडची श्वेता त्रिपाठी



बॉलिवूड आणि ओटीटी विश्वात आपल्या दमदार अभिनयामुळे वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री श्वेता त्रिपाठी आज प्रेक्षकांच्या आवडत्या अभिनेत्रींपैकी एक आहे. मिर्झापूर मधील 'गोलू गुप्ता' असो किंवा 'मसान' मधील निरागस 'शालू गुप्ता', श्वेताने प्रत्येक भूमिका प्रभावीपणे साकारली आहे. मात्र अभिनयाव्यतिरिक्त तिच्या आयुष्यातील अनेक गोष्टी अशा आहेत, ज्या अनेक चाहत्यांना आजही माहिती नाहीत. श्वेता त्रिपाठीला अभिनयाइतकाच साहसी खेळांचाही छंद आहे. ती प्रमाणित स्कूबा डायव्हर असून तिने अंदमान येथे स्कूबा डायव्हिंग आणि स्नॉर्केलिंगचे प्रशिक्षण घेतले आहे. समुद्रातील रंगीबेरंगी जीवसृष्टी अनुभवणे तिला खूप आवडते. एवढेच नव्हे तर तिला सर्फिंगचाही छंद आहे. तिने पुडुचेरी येथे सर्फिंग शिकली असून संधी मिळाली की ती पुन्हा पुडुचेरीला भेट देणे पसंत करते. श्वेताचा करिअरचा प्रवासही तितकाच रंजक आहे. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिने कायद्याच्या प्रवेश परीक्षेत यश मिळवले होते. मात्र तिच्या आयुष्याने वेगळे वळण घेतले. वकिलीचे शिक्षण न निवडता तिने National Institute of Fashion Technology (निफ्ट) मध्ये प्रवेश घेतला. येथे तिने फॅशन कम्युनिकेशनमध्ये चार वर्षांचा बॅचलर ऑफ डिझाइन अभ्यासक्रम पूर्ण केला. शिक्षणादरम्यानच तिला जाणवले की तिचे खरे स्वप्न अभिनय क्षेत्रात करिअर करण्याचे आहे. यानंतर तिने अभिनयाकडे पूर्णपणे लक्ष केंद्रित केले आणि मेहनतीच्या जोरावर बॉलिवूड तसेच ओटीटीमध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. 'मसान' या चित्रपटातून तिने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले, तर 'मिर्झापूर'मधील 'गोलू गुप्ता' या भूमिकेमुळे ती घराघरात लोकप्रिय झाली. विशेष म्हणजे, या मालिकेतील प्रमुख कलाकारांमध्ये सर्वप्रथम श्वेताचीच निवड झाली होती. तिच्या अभिनयातील नैसर्गिकपणा आणि भूमिकेत पूर्णपणे समरस होण्याची क्षमता यामुळे तिला ही संधी मिळाली. श्वेताच्या वैयक्तिक आयुष्यातील प्रेमकथाही तितकीच खास आहे. तिची आणि तिचे पती, रॅपर चैतन्य शर्मा यांची पहिली भेट विमानप्रवासादरम्यान झाली होती. सुरुवातीला दोघांमध्ये फारसा संवाद नव्हता. मात्र प्रवास जसजसा पुढे गेला तसतसे दोघांमध्ये गप्पा सुरू झाल्या. या मैत्रीचे पुढे प्रेमात रूपांतर झाले आणि २०१८ मध्ये दोघांनी लग्न केले. अभिनय आणि साहसी खेळांबरोबरच श्वेताला लहानपणापासून नृत्याचीही आवड होती. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी तिने कथक आणि भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली होती. मात्र सराव करताना घुंगरूंचा त्रास होत असल्याने तिने पुढे नृत्याचे प्रशिक्षण थांबवले. तरीही कला आणि सर्जनशीलतेशी तिचे नाते कायम राहिले.

# टीम इंडियाला मोठा फटका

## श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारताची निराशाजनक कामगिरी; आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये घसरण

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेट संघाच्या सलग पराभवाचा थेट फटका आता आयसीसी क्रमवारीत (ICC Rankings) बसल्याचे दिसून येत आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाला गेल्या चार आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांमध्ये एकही विजय मिळवता आलेला नाही. या सुमार कामगिरीमुळे आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये भारतीय संघाच्या रेटिंग गुणांमध्ये घसरण झाली.**




या सुमार कामगिरीमुळे आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये भारतीय संघाच्या रेटिंग गुणांमध्ये घसरण झाली असून, दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंड संघाने भारतासोबतचे अंतर कमालीचे कमी केले आहे. आगामी सामन्यांमध्येही पराभवाची ही मालिका अशीच सुरू राहिल्यास टीम इंडियाला आपले अव्वल स्थान गमवावे लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

नियमित कर्णधारांच्या अनुपस्थितीत श्रेयस अय्यरकडे संघाची धुरा सोपवण्यात आली असली, तरी कर्णधार म्हणून आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पहिल्या विजयासाठी त्याला अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. भारतीय संघ आयर्लंड दौऱ्यावर गेला, तेव्हा संघ ही मालिका सहज जिंकेल अशी क्रीडाप्रेमींना आशा होती. मात्र, पहिल्याच सामन्यात भारताला पराभवाचा धक्का बसला. त्यानंतर दुसऱ्या सामन्यातही पराभव पत्करावा लागल्याने, आयर्लंडविरुद्ध एकही सामना न जिंकता परतण्याची नामुष्की टीम इंडियावर ओढवली.

आयर्लंडच्या दौऱ्यानंतर भारतीय संघाचा इंग्लंड दौरा सुरू झाला. या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे अनिर्णित राहिला, तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने भारताचा चार गडी राखून पराभव केला. अशा प्रकारे श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या गेल्या चार सामन्यांपैकी ३ सामन्यांत भारताला पराभव स्वीकारावा लागला आहे, तर १ सामना पावसामुळे रद्द झाला आहे.

### भारतीय क्रिकेट संघाचे मालिका पराभवासह रँकिंगचे संकट गडद

या पाच सामन्यांच्या मालिकेत आता तीन सामने शिल्लक आहेत. भारतासमोर केवळ मालिका वाचवण्याचेच नव्हे, तर रँकिंगमधील अव्वल स्थान टिकवून ठेवण्याचेही मोठे आव्हान आहे. पुढील सामन्यात जर भारताचा पराभव झाला आणि इंग्लंडने विजय मिळवला, तर दोन्ही संघांमधील रेटिंगचे अंतर आणखी कमी होईल. यामुळे भारताची मालिका जिंकण्याची आशा तर संपुष्टात येईलच, शिवाय टी-२० रँकिंगमधील नंबर वनचे स्थानही धोक्यात येईल. या मालिकेतील अत्यंत महत्त्वाचा असलेला तिसरा सामना ७ जुलै रोजी (मंगळवारी) खेळवला जाणार आहे.

### भारत आणि इंग्लंडमधील रेटिंगचे अंतर घटले

भारत आणि इंग्लंड यांच्यातील मालिका सुरू होण्यापूर्वी आयसीसी टी-२० क्रमवारीत भारतीय संघ २७२ रेटिंग गुणांसह अग्रस्थानावर होता, तर इंग्लंडचा संघ २६२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर होता. मात्र, ताज्या आकडेवारीनुसार भारताचे रेटिंग गुण २७२ वरून घसरून २७१ झाले आहेत. दुसरीकडे, इंग्लंडने दमदार कामगिरीच्या जोरावर आपल्या रेटिंग गुणांमध्ये वाढ करत ते २६४ वर नेले आहेत. परिणामी, दोन्ही संघांमधील जे अंतर आधी १० गुणांचे होते, ते आता अवघ्या ७ गुणांवर आले आहे.

# ब्राझीलचे विश्वचषकातील आव्हान संपुष्टात; नेमारची निवृत्ती

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**फिफा विश्वचषक स्पर्धेत रविवारी रात्री ब्राझीलचे आव्हान अत्यंत नाट्यमय आणि दुर्दैवीरीत्या संपुष्टात आले. या पराभवासोबतच ब्राझीलच्या फुटबॉल इतिहासातील एका सुवर्णकाळाचाही अंत झाला आहे. 'मेटलाईफ स्टेडियम'वर झालेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात नॉर्वेने ब्राझीलचा २-१ असा पराभव केला. या पराभवानंतर भावूक झालेल्या नेमारने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून आपल्या निवृत्तीची घोषणा केली.**



सहाव्यांदा विश्वचषक उंचावण्याचे स्वप्न घेऊन मैदानात उतरलेल्या ब्राझीलला नॉर्वेने स्पर्धेतील सर्वात मोठा धक्का दिला. ब्राझीलचा नॉर्वेने २-१ ने पराभव केला. नॉर्वेच्या एर्लिंग हालांडने उत्तरार्धात लागोपाठ दोन गोल करत सामना नॉर्वेच्या बाजूने झुकवला. सामन्याच्या अगदी शेवटच्या मिनिटांत नेमारने पेनल्टीवर गोल करून ब्राझीलचे खाते उघडले, परंतु तोपर्यंत ब्राझीलचा पराभव निश्चित झाला होता. सामन्याची अंतिम शिटी वाजताच नेमार मैदानातच डोक्याला हात लावून रडू लागला, तेव्हा सहकाऱ्यांनी त्याचे सांत्वन केले. हे अश्रू केवळ सामन्यातील पराभवाचे नव्हते, तर आंतरराष्ट्रीय फुटबॉलला निरोप देण्याचे दुःख त्यात होते.

सामन्यानंतर पत्रकारांशी बोलताना नेमार म्हणाला, "माझी आंतरराष्ट्रीय कारकीर्द याच मेटलाईफ स्टेडियमवरून सुरू झाली होती आणि आज याच मैदानावर ती संपली आहे. आता हा प्रवास इथेच थांबत आहे."

२०१० मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या नेमारने आपल्या १६ वर्षांच्या कारकिर्दीत ४ फिफा विश्वचषक आणि २ ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये ब्राझीलचे प्रतिनिधित्व केले. आंतरराष्ट्रीय फुटबॉलला रामराम ठोकला असला, तरी नेमारने व्यावसायिक फुटबॉलमधून पूर्णपणे निवृत्ती जाहीर केलेली नाही. या वर्षाच्या सुरुवातीला आपल्या भविष्याबद्दल बोलताना तो म्हणाला होता, "पुढे काय होईल, हे मला माहित नाही. कदाचित डिसेंबर महिना येईपर्यंत मला पूर्णपणे निवृत्त व्हावेसे वाटेल.

दरम्यान, या विजयासह नॉर्वेने विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली असून, तिथे त्यांचा सामना मेक्सिको विरुद्ध इंग्लंड यांच्यातील विजेत्याशी होईल. परंतु, ब्राझीलच्या फुटबॉल इतिहासात हा विश्वचषक त्यांच्या एका महान जादुगाराच्या भावूक निरोपासाठी कायम लक्षात राहील.

### विक्रमी कारकिर्दीला पूर्णविराम

नेमारने ब्राझीलसाठी १३० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक ८० गोल आणि ५९ असिस्ट नोंदवले आहेत. तो ब्राझीलसाठी पुरुष फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून निवृत्त होत आहे. तसेच, ब्राझीलसाठी सर्वाधिक सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो दुसऱ्या क्रमांकावर आहे. केवळ गोलच नव्हे, तर ब्राझीलला यश मिळवून देण्यात त्याचा मोठा वाटा होता. २०१२ च्या ऑलिम्पिकमध्ये त्याने रौप्य पदक जिंकले, तर २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये आपल्या नेतृत्वाखाली ब्राझीलला ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून दिले. २०२६ च्या विश्वचषकापूर्वी तो दुखापतींशी झुंजत होता, त्यामुळे संघात त्याच्या निवडीचे देशभरात स्वागत झाले होते.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
दि. 07 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### ११ पूल पाण्याखाली; अंडरपास जलमय, शहरभर वाहतूक कोलमडली; नागरिकांचे तासन्तास हाल

# पावसाने उद्योगनगरी ठप्प; ५९ ठिकाणी पाणी, ३५ रस्ते बंद

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरात सोमवारी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. शहरातील ५९ ठिकाणी पाणी तुंबल्याने ३५ प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करावे लागले, तर ११ पूल पाण्याखाली गेल्याने अनेक भागांचा संपर्क तुटला. कार्यालयीन वेळेतच अचानक रस्ते बंद झाल्याने वाहनचालक, नोकरदार, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी गैरसोय झाली. पर्यायी मार्गांवरही प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याने अनेकांना तासन्तास अडकून पडावे लागले.**






वल्लभनगर, एचए चौक, साई चौक, पुनावळे, ताथवडे आणि मामुर्डी येथील अंडरपास पूर्णपणे जलमय झाल्याने ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहने पाण्यात बंद पडली, तर काही वाहनचालकांना वाहने ढकलत बाहेर काढावी लागली.

रिव्हर व्ह्यू चौक, अहिंसा चौक, भक्ती-शक्ती चौक, नाशिक फाटा, संत तुकारामनगर, चिखली, मोशी, भोसरी, रहाटणी, पिंपळे सौदागर, आळंदी, चाकण आणि देहूरोड परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग अत्यंत मंदावला. वाहतूक पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव अनेक मार्ग बंद करून पर्यायी मार्गांवर वाहतूक वळविली; मात्र तेथेही मोठी कोंडी झाली.

शाळांकडून सुटीबाबतचे संदेश उशिरा मिळाल्याने पालकांची मोठी धावपळ झाली. औद्योगिक वसाहतीतील कामगार, कार्यालयीन कर्मचारी, मालवाहतूक करणारे वाहनचालक आणि रुग्णालयांकडे जाणाऱ्या नागरिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अनेक ठिकाणी रुग्णवाहिकांनाही वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी संघर्ष करावा लागला.

दिघी-आळंदी परिसरातील इंद्रायणी नदीवरील चार पूल पाण्याखाली गेल्याने आळंदी, मरकळ, तुळापूर, धानोरी आणि चाकणकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात आली. तर निगडी विभागातील धनेश्वर, बटरफ्लाय आणि केशवनगर पूल बंद झाल्याने नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागला.

चिखली, मोशी आणि वाकी फाटा परिसरातही पाणी साचल्याने पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. वाकी फाटा येथे वाहतूक भाम फाटा मार्गे वळविण्यात आल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

वाकड, हिंजवडी आणि ताथवडे येथील आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही पावसाचा मोठा फटका बसला. अनेकांनी वाहने रस्त्याच्या कडेला उभी करून पाणी ओसरण्याची प्रतीक्षा केली.

सततच्या पावसामुळे शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले असून वाहतूक पोलिसांनी धोकादायक पूल, अंडरपास आणि नदीकाठचे मार्ग बंद केले आहेत. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये तसेच पूल, नदीपात्र आणि अंडरपास परिसरात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आणखी काही मार्ग बंद करण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## पाण्याखाली गेले प्रमुख अंडरपास

मुसळधार पावसामुळे शहरातील वल्लभनगर, एचए चौक, साई चौक, पुनावळे, ताथवडे आणि मामुर्डी येथील अंडरपास पूर्णपणे जलमय झाल्याने ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. अनेक दुचाकी व चारचाकी वाहने पाण्यात बंद पडली, तर काही वाहनचालकांना वाहने ढकलत बाहेर काढावी लागली. सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक पोलिसांनी अंडरपास परिसरात बॅरिकेड्स लावून पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले.

## ११ पूल बंद; अनेक भागांची संपर्क तुटला

इंद्रायणी नदीवरील चार पूल पाण्याखाली गेल्याने आळंदी, मरकळ, तुळापूर, धानोरी आणि चाकणकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद झाली. तसेच निगडी विभागातील धनेश्वर, बटरफ्लाय आणि केशवनगर पुलांसह शहरातील एकूण ११ पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागला.

# नैसर्गिक आपत्तीमध्ये 'वर्क फ्रॉम होम' द्या!

## सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. विशेषतः हिंजवडी आयटी हबकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळांना सुट्टीही जाहीर करण्यात आली आहे.**



या पार्श्वभूमीवर नैसर्गिक आपत्तीच्या काळात आयटी कर्मचाऱ्यांसाठी प्रशासनाने अधिकृतरीत्या 'वर्क फ्रॉम होम' (Work from Home) लागू करण्याची मागणी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी फेडरेशन (PCCHSF)चे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी केली आहे.

यासंदर्भात सचिन लोंढे यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना स्वतंत्र निवेदन सादर करून आपत्कालीन परिस्थितीत आयटी कंपन्यांना कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली आहे.

त्यांच्या मते, अतिवृष्टी, पूरस्थिती किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात मोठ्या संख्येने आयटी कर्मचारी कार्यालयाकडे निघाल्याने आधीच विस्कळीत झालेल्या वाहतूक व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे नागरिकांची सुरक्षितता धोक्यात येण्याबरोबरच आपत्कालीन सेवांच्या कामातही अडथळे निर्माण होतात. हिंजवडी, तळवडे आणि इतर आयटी पार्ककडे जाणारे रस्ते पावसाळ्यात अनेकदा पाण्याखाली जात असल्याने हजारो कर्मचाऱ्यांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागते. याचा परिणाम त्यांच्या सुरक्षिततेवर, आरोग्यावर आणि उत्पादकतेवरही होत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

लोंढे यांनी प्रशासनाला सुचविले आहे की, हवामान खात्याचा रेड अलर्ट, अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्ती जाहीर झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने आयटी कंपन्यांना तातडीने 'वर्क फ्रॉम होम' लागू करण्याबाबत अधिकृत सूचना द्याव्यात. त्यामुळे रस्त्यांवरील वाहनांची संख्या कमी होईल, वाहतूक सुरळीत ठेवणे सोपे जाईल आणि अग्निशमन दल, रुग्णवाहिका, पोलीस तसेच इतर आपत्कालीन यंत्रणांना अधिक प्रभावीपणे काम करता येईल.

सध्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांत पाणी साचले आहे. हिंजवडी आयटी हबला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवर वाहतुकीचा वेग अत्यंत मंदावला असून, अनेक कर्मचारी तासन्तास कोंडीत अडकून पडल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

"पावसाळा आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात आयटी कर्मचाऱ्यांची होणारी फरफट आणि वाहतूक कोंडी थांबवण्यासाठी प्रशासनाने 'वर्क फ्रॉम होम'चे धोरण तातडीने लागू करावे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी फेडरेशन या मागणीचा प्रशासनाकडे शेवटपर्यंत पाठपुरावा करेल."

**- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

### नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी फेडरेशनची मागणी

शहरातील नोकरदार वर्ग, गृहनिर्माण सोसायट्यांमधील रहिवासी आणि आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास व्यक्त करत सचिन लोंढे यांनी प्रशासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी फेडरेशन या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नागरिकांच्या मदतीसाठी नगरसेविका योगिता नागरगोजे मैदानात

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**सातत्याने सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रभाग क्रमांक ११ मधील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. घरकुल परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे अनेक कुटुंबे घरातच अडकून पडली, तर शरदनगर-नेवाळे वस्ती परिसरातील अनेक कॉलनींमध्ये घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**



सततच्या मुसळधार पावसामुळे प्रभाग क्रमांक ११ मधील अनेक भागांमध्ये नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला आमचे सर्वोच्च प्राधान्य असून प्रशासनाच्या समन्वयाने पाणी उपसा, मदतकार्य आणि आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कोणत्याही नागरिकाला संकटात एकटे सोडले जाणार नाही. कृपया अफवांवर विश्वास ठेवू नका, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करा आणि आवश्यक मदतीसाठी तात्काळ संपर्क साधा. या कठीण काळात आम्ही प्रत्येक नागरिकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत.

**- योगिता नागरगोजे, नगरसेविका, प्रभाग क्र. ११, पिंपरी-चिंचवड.**

या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत नागरिकांची भेट घेतली आणि पूरग्रस्त भागाची पाहणी केली. नागरिकांच्या अडचणी जाणून घेत त्यांनी प्रशासनाशी समन्वय साधत तात्काळ मदतकार्य सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला.

कार्यसम्राट आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवीदादा लांडगे, अतिरिक्त आयुक्त बगाडे, अधिकारी मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, स्थापत्य व ड्रेनेज विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, घरकुल फेडरेशनचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह पूरग्रस्त भागाची संयुक्त पाहणी करण्यात आली. यावेळी साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा करणे, बाधित नागरिकांना मदत उपलब्ध करून देणे आणि आवश्यक यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी प्रत्येक बाधित कुटुंबाशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच प्रशासनामार्फत आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत संपूर्ण यंत्रणा सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी नागरिकांना अनावश्यक घराबाहेर पडणे टाळण्याचे, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ महापालिका प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी म्हणून प्रत्यक्ष पूरग्रस्त भागात उपस्थित राहून नागरिकांना धीर देत मदतकार्याला गती दिल्यामुळे नगरसेविका योगिता नागरगोजे यांच्या कार्याचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले. "जनसेवा हीच काळाची गरज" या भूमिकेतून त्यांनी प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय साधत मदतकार्य अधिक प्रभावी करण्यासाठी पुढाकार घेतला.

# भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी जपली माणुसकी

## रहाटणीतील पूरस्थितीत राम मंदिरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीला धाव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**संततधार मुसळधार पावसामुळे पवना नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने रहाटणी परिसरातील ऐतिहासिक राम मंदिरात पूराचे पाणी शिरले. अचानक वाढलेल्या पाण्यामुळे मंदिर परिसरात लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह अनेक भाविक अडकून पडले. या घटनेची माहिती मिळताच भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा स्थानिक नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत बचावकार्याची सूत्रे हाती घेतली.**



पूरस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून श्री. काटे यांनी तात्काळ महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन पथकाला आणि अग्निशामक दलाला घटनास्थळी पाचारण केले. नदीची पाणीपातळी सातत्याने वाढत असतानाही त्यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण बचाव मोहिमेवर लक्ष ठेवले.

शत्रुघ्न काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्कालीन पथकाने बोटी आणि आवश्यक सुरक्षा साहित्याच्या साहाय्याने मंदिरात अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढले. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य देत त्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले. तसेच परिसरातील इतर धोकादायक ठिकाणांचाही आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

या वेळी श्री. काटे यांनी नागरिकांना नदीकाठच्या परिसरात जाणे टाळण्याचे, प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, "पावसाचा जोर लक्षात घेता प्रशासन पूर्णपणे सतर्क असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे आणि सुरक्षित ठिकाणी राहावे. कोणत्याही आपत्कालीन मदतीसाठी आम्ही चोवीस तास नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहोत."

या संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी म्हणून केवळ सूचना देण्यापुरते न थांबता स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून बचावकार्याला दिशा दिल्याने रहाटणी परिसरातील नागरिकांनी श्री. शत्रुघ्न काटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. आस्मानी संकटाच्या काळात दाखविलेली तत्परता, संवेदनशीलता आणि माणुसकीची भावना यामुळे शत्रुघ्न काटे यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



> नागरिकांच्या जीवापेक्षा मौल्यवान काहीच नाही. पूरस्थितीवर प्रशासनासोबत आम्ही सातत्याने लक्ष ठेवून आहोत. अडकलेल्या प्रत्येक नागरिकाला सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, नदीकाठच्या धोकादायक भागात जाणे टाळावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ संपर्क साधावा. संकटाच्या या काळात आम्ही प्रत्येक नागरिकासोबत खंबीरपणे उभे आहोत.
>
> **- शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# मतदार यादी अद्ययावतीकरण (SIR) मोहिमेत १०० टक्के सहभाग नोंदवा!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी फेडरेशन (PCCHSF) पुढाकार घेत असून, शहरातील सर्व गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी या लोकशाही बळकटीकरणाच्या राष्ट्रीय मोहिमेत शंभर टक्के सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन फेडरेशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी केले आहे.**



पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. ६ जुलै) विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) मोहिमेसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सचिन लोंढे यांच्या नेतृत्वाखाली पीसीसीएचएसएफच्या शिष्टमंडळासह शहरातील विविध गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, सचिव आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीमध्ये गृहनिर्माण संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या पात्र नागरिकांची मतदार नोंदणी सुलभ करणे, नवमतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे, मतदार यादीतील त्रुटी दूर करणे तसेच संपूर्ण प्रक्रिया वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांनी प्रशासनाला कशा प्रकारे सहकार्य करावे, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना सचिन लोंढे म्हणाले की, लोकशाहीच्या सुदृढीकरणासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे अत्यावश्यक आहे. मतदार नोंदणी ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून प्रत्येक नागरिकाचे लोकशाहीप्रती असलेले कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक गृहनिर्माण संस्थेने या मोहिमेला प्राधान्य देत आपल्या परिसरातील एकही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी.

ते पुढे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष, सचिव आणि व्यवस्थापन समितीने एसआयआर मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा. निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले बूथ लेव्हल अधिकारी (BLO) प्रत्येक नागरिकाच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन पडताळणी आणि नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. या अधिकाऱ्यांना आवश्यक ती सर्व माहिती, सहकार्य आणि सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रत्येक सोसायटीची जबाबदारी आहे.

प्रत्येक पात्र नागरिक मतदार म्हणून नोंदणीकृत व्हावा, यासाठी सोसायटी स्तरावर जनजागृती करावी, नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची माहिती द्यावी आणि बीएलओंना भेटीदरम्यान सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

लोंढे यांनी सांगितले की, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार बीएलओ संबंधित नागरिकाच्या घरी तीन वेळा भेट देऊनही जर संबंधित व्यक्तीने एसआयआर प्रक्रियेत सहभाग घेतला नाही, तर त्यानंतर त्यांना स्वतंत्रपणे अपील प्रक्रिया करावी लागू शकते. त्यामुळे कोणत्याही नागरिकाने ही प्रक्रिया दुर्लक्षित करू नये. वेळेत सहभाग नोंदविल्यास भविष्यात मतदानाचा अधिकार अबाधित राहण्यास मदत होईल.

> लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) मोहिमेत गृहनिर्माण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक सोसायटीचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन आपल्या सोसायटीतील प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार नोंदणी शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे. बीएलओ नागरिकांच्या घरी भेट देणार असल्याने त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे ही आपली लोकशाहीप्रती असलेली सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक पात्र नागरिक मतदार झाला पाहिजे, यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.
>
> **- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी फेडरेशन**

# आयुष्यमानचा लाभ प्रत्येक गरजूपर्यंत पोहचणार

## सामाजिक उपक्रम : पुनावळे परिसरात आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी आयुष्मान भारत योजना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पुनावळे परिसरात आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सुरक्षा अभियान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने नागरिकांनी शिबिरात सहभागी होत आयुष्मान भारत योजनेची माहिती घेतली, आवश्यक नोंदणी करून घेतली तसेच विविध आरोग्यविषयक सेवांचा लाभ घेतला. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.**




> आयुष्मान भारत योजना ही केवळ एक शासकीय योजना नसून, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी आरोग्य संरक्षणाची मोठी हमी आहे. या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचावा, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. कोणताही नागरिक माहितीअभावी किंवा तांत्रिक अडचणींमुळे या योजनेपासून वंचित राहू नये, हेच आमचे ध्येय आहे.
>
> **- जालिंदर काटे, सचिव, भाजपा, युवा मोर्चा.**

या शिबिराच्या आयोजनात भाजपा युवा मोर्चा सचिव जालिंदर काटे यांनी पुढाकार घेतला. शासकीय आरोग्य योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचावा, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा करत विविध स्तरांवर समन्वय साधला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक कार्यकर्ते, मान्यवर आणि नागरिकांच्या सहकार्याने शिबिराचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता किसान मोर्चा मंडल अध्यक्ष रामदास भाऊ काटे, भरत अण्णा काटे, बाजीराव तात्या बहिरट, राजू तात्या ताजने, मच्छिंद्र तात्या काटे, बाळासाहेब काटे, संतोष दादा दर्शले, गणेश भाऊ दर्शले, ज्येष्ठ पत्रकार नंदन मिठारी, प्राध्यापक अण्णा त्र्यंबक पाटील, अनिल बारवकर, सुनील कांबळे, महावीर देशमाने, सुभाष महाले, सचिन काटे, मारुती काटे यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी शिबिराच्या आयोजनाचे कौतुक करत अशा जनहिताच्या उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गोल्डन ट्रेजर सोसायटीचे चेअरमन व सदस्य समिती यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे नियोजनबद्ध पद्धतीने शिबिर पार पडले. याबद्दल आयोजकांनी त्यांचे विशेष आभार मानले.

जालिंदर काटे म्हणाले, "आरोग्य ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. केंद्र शासनाची आयुष्मान भारत योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत आहे. या योजनेचा लाभ कोणताही पात्र नागरिक केवळ माहितीअभावी वंचित राहू नये, यासाठी आम्ही सातत्याने जनजागृती करत आहोत. भविष्यातही अशाच लोकाभिमुख आरोग्य शिबिरांचे आयोजन करून अधिकाधिक नागरिकांना शासनाच्या योजनांशी जोडण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील."

या उपक्रमामुळे अनेक नागरिकांना आयुष्मान भारत योजनेची सविस्तर माहिती मिळाली, तसेच आवश्यक कागदपत्रे, नोंदणी प्रक्रिया आणि योजनेअंतर्गत मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यातही अशा आरोग्यविषयक जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

---

# भोसरी मध्ये ST स्मार्ट कार्ड (NCMC) नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**प्रभाग क्र. ५ मधील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्या परिसरातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नगरसेविका सौ. कविता भोंगाळे-पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या ST स्मार्ट कार्ड (NCMC) नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विदर्भमित्र मंडळ, सिद्धेश्वर हायस्कूलजवळ, दिघी रोड, भोसरी येथे पार पडलेल्या या शिबिरात महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्मार्ट कार्ड नोंदणी केली.**





> प्रभागातील प्रत्येक नागरिकापर्यंत शासनाच्या योजना सहज आणि सुलभ पद्धतीने पोहोचाव्यात, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. नागरिकांना शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत, तर त्यांच्या परिसरातच सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा आमचा उद्देश आहे. भविष्यातही नागरिकांच्या हिताचे आणि त्यांच्या दैनंदिन जीवनाला उपयोगी ठरणारे असे लोकाभिमुख उपक्रम राबवत राहू.
>
> **- कविता भोंगाळे-पाटील, नगरसेविका , भाजपा, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

शिबिरात १३ वर्षांवरील महिला तसेच ६० वर्षांवरील पुरुषांची नोंदणी करण्यात आली. आधार कार्ड व आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकाच्या साहाय्याने नागरिकांची प्रक्रिया सुलभरीत्या पूर्ण करण्यात आली. शासनाच्या नियमानुसार विहित शुल्क भरून अनेक लाभार्थ्यांनी ST स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली.

NCMC स्मार्ट कार्डमुळे ST बस, मेट्रो तसेच इतर सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ एकाच कार्डाद्वारे घेता येणार असून, आधार व UDID लिंकिंगसह सुरक्षित डिजिटल व्यवहाराची सुविधाही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या उपक्रमाबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी बोलताना नगरसेविका सौ. कविता भोंगाळे-पाटील म्हणाल्या, "शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागू नये, तर त्या सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हाव्यात, हा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. भविष्यातही नागरिकांच्या हिताचे असे उपक्रम राबविण्यात येतील."

या उपक्रमाला नगरसेवक सागर भैया गवळी, मंडल अध्यक्षा रोहिणी ताई मांढर, माजी मंडल अध्यक्ष रवींद्र नांदुरकर, प्रभाग अध्यक्षा स्वातीताई शिर्के, प्रभाग उपाध्यक्षा मनिषा ताई गंगणे, सुधाकर वसे, सांगळे गुरुजी तसेच कल्पना धाडसे यांनी भेट देऊन शिबिराच्या आयोजनास सहकार्य केले. उपस्थित मान्यवरांनी नागरिकांशी संवाद साधत शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले.

प्रभागातील नागरिकांच्या सोयीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करत आयोजकांचे आभार मानले. भविष्यातही अशा लोकाभिमुख शिबिरांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

# युनिफाईट स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचा दबदबा!

## १६ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड; जिल्हास्तरावर दमदार कामगिरी



**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**येथील ७ वी जिल्हास्तरीय युनिफाईट स्पर्धा नुकतीच (५ जुलै २०२६ रोजी) कावेरी नगर क्रीडा संकुल वाकड येथे अत्यंत नेटके नियोजन आणि भव्य दिव्य वातावरणात दिमाखात पार पडली. या स्पर्धेत पिंपरी चिंचवडमधील सुमारे २० शाळांमधून १८५ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता.**

या सर्व शाळांमधून 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट आणि स्पर्धात्मक खेळाच्या जोरावर मैदान मारत शाळेच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला. या शाळेतील एकूण १६ विद्यार्थ्यांची आता आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "खेळामुळे जीवनाला एक नवी दिशा मिळते," असे सांगत मान्यवरांनी पिंपरी चिंचवड युनिफाईट संघटना या खेळाच्या प्रसारासाठी घेत असलेल्या मेहनतीचे कौतुक केले. तसेच, शहरात दिवसेंदिवस युनिफाईट खेळाडूंची संख्या आणि दर्जा वाढत असल्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला.

या यशाचे खरे शिल्पकार ठरलेले शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. यशवंत माने सर यांना संस्थेच्या वतीने कौतुकाची थाप देण्यात आली. तसेच, भविष्यात अशाच प्रकारे जास्तीत जास्त कौशल्यवान व गुणवान खेळाडू घडवण्यावर भर द्यावा, अशा सदिच्छाही मान्यवरांनी यावेळी दिल्या.

### मान्यवरांची उपस्थिती अन् कौतुकाची थाप

या भव्य क्रीडा स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष श्री. अभिषेक (भाऊ) बारणे, क्रीडा समिती सदस्य तथा नगरसेवक श्री. तानाजी (भाऊ) बारणे, मनपाचे कर्तव्यदक्ष क्रीडा अधिकारी श्री. दीपक कान्हेरे सर आणि मिलेनियम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर आदी मान्यवर उपस्थित होते.

### संस्था व मुख्याध्यापकांकडून पाठीवर शाबासकी

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल मिलेनियम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर, सचिव श्री. अशोक मोरे सर, खजिनदार सौ. सुरेखा पवार मॅडम, मुख्याध्यापिका विद्या नाईक मॅडम आणि नायगम अग्निस मॅडम यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे भरभरून कौतुक केले.

### सातारा येथील 'राज्यस्तरीय' स्पर्धेचे वेध

स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या १६ विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन घडवले. या विजेत्या सर्व खेळाडूंची आगामी २२ आणि २३ ऑगस्ट रोजी सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशामुळे सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> आमच्या न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय युनिफाईट स्पर्धेत मिळवलेले यश अतिशय अभिमानास्पद आहे. १६ विद्यार्थ्यांची थेट राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झालेली निवड ही संस्थेच्या दर्जेदार क्रीडा संस्कृतीची पावती आहे. क्रीडा शिक्षक यशवंत माने सर यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच हे शक्य झाले. सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेतही आमचे खेळाडू अशीच उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा व शहराचा नावलौकिक वाढवतील, असा मला पूर्ण विश्वास आहे. सर्व विजेत्या खेळाडूंना संस्थेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!
>
> - **श्री. विजय पवार (अध्यक्ष, मिलेनियम एज्युकेशन सोसायटी)**

# शिष्यवृत्ती परीक्षेत श्री स्वामी समर्थ विद्यामंदिरची सुवर्णभरारी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी आणि ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत (२०२५-२६) भोसरी येथील टागोर शिक्षण संस्थेच्या 'श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर' (इंद्रायणी नगर) या विद्यालयाने यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.**

विद्यालयाची इयत्ता ८ वीची विद्यार्थिनी कु. ऋतुंबरा अभिजीत काळे हिने ३०० पैकी २७६ गुण मिळवून संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. ऋतुंबराने राज्यात गुणवत्ता यादीत १२ वा तर पुणे जिल्ह्यात ६ वा क्रमांक मिळवून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

ऋतुंबरा सोबतच इयत्ता ८ वीमधून कु. श्रेया योगेश कलशेट्टी (२३४/३०० गुण) आणि टागोर विद्यालयाचा विद्यार्थी सुरज अरविंद सोळंकी (२२०/३०० गुण) यांनीही परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांचीही बाजी इयत्ता ५ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली. यामध्ये इंद्रवदन अभिजीत काळे याने २५०/३०० गुण आणि राजवीर परमेश्वर कांबळे याने २२६/३०० गुण मिळवून राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले आहे. या दोन्ही इयत्तांमधील अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.



### मार्गदर्शक शिक्षकांचे योगदान

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांना मिळालेले दर्जेदार मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरले. ८ वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक श्री. बनसुडे सुखदेव, श्री. कुंभार संजय व श्री. घाडगे किसन यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तसेच ५ वीच्या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री. बनसुडे सुखदेव, श्री. तोरणे शरद आणि श्री. भालेराव श्रीकृष्ण यांचेही या यशात मोठे योगदान आहे.

### संस्थेच्या वतीने कौतुकाचा वर्षाव

विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व अण्णासाहेब मगर बँकेचे चेअरमन श्री. नंदकुमार विठोबा लांडे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. महेश घावटे, सचिव श्री. सुरेश फलके, सुरज स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. सुरजभाऊ लांडे पाटील, श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर (माध्यमिक) चे मुख्याध्यापक श्री. ढोले उद्धव, टागोर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संतोष काळे, लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्या मंदिरचे मुख्याध्यापक श्री. हनुमंत आगे, श्री स्वामी समर्थ (प्राथमिक) विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा गुरव, पर्यवेक्षक श्री. शिवाजी गुरव आणि सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. या यशामुळे संपूर्ण भोसरी परिसरातून विद्यालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांचीही बाजी

इयत्ता ५ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली. यामध्ये इंद्रवदन अभिजीत काळे याने २५०/३०० गुण आणि राजवीर परमेश्वर कांबळे याने २२६/३०० गुण मिळवून राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले आहे. या दोन्ही इयत्तांमधील अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.